ePaper

## सत्तेचा गैरवापर करून चिन्ह मिळवलंय पण पक्षाचा बाप आमच्यासोबत, रोहित पवार



| वर्ष - 7 | अंक - 264 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 07 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- तिसऱ्या कसोटीत बुमराहला आराम?
- बॉबीच्या चाहत्यांसाठी खुशखबर
- प्रस्थापितांची जागा कोण घेणार?
- कुणाला सांगताय म्हातारा झालोय?


### पिंपरी-चिंचवडकरांचे श्रद्धास्थान इंद्रायणी, पवनामाईची घुसमट



# हतबल राजकारणी; बेजबाबदार प्रशासन!

### » शहराला चार आमदार, दोन खासदार तरीही नदी सुधार प्रकल्पाकडे अक्षम्य दुर्लक्ष

।पिंपरी। महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी।

**सुमारे ३० लाख लोकसंख्या असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी पवना नदी आणि श्रीक्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदीला जोडणारी विशेष म्हणजे वारकरी सांप्रदायामध्ये ज्या नदीचे पाणी अमृत म्हणून प्राषण केले जाते, अशी पवित्र इंद्रायणी. या दोन्ही नद्या औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवडच्या वैभव आहेत. मुळा नदीचीही तीच अवस्था आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या नद्या मरणासन्न अवस्थेत आहेत. निवडणुकांच्या तोंडावर नदी सुधार प्रकल्पाच्या आनाभाका घेणारे सर्वपक्षीय नेते केवळ घोषणाबाजीत दंग असून, महापालिका प्रशासन 'ना सोयर ना सूतक' अशा भूमिकेत आहेत. त्यामुळे नद्यांचे अस्थित्व संपुष्टात आले असून, गटारगंगा झालेल्या नद्या वाचवण्यासाठी आता लोकचळवळ उभी करावी लागणार आहे. शहरात महेश लांडगे, अण्णा बनसोडे, अश्विनी जगताप, उमा खापरे असे चार आमदार, श्रीरंग बारणे, अमोल कोल्हे असे दोन खासदार आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि धडाकेबाज निर्णयासाठी ओळखले जाणारे पालकमंत्री अजित पवार पालकमंत्री आहेत. मात्र, तरीही पवना आणि इंद्रायणी 'अनाथ' आहेत, अशी खंत पर्यावरण प्रेमी आणि पिंपरी- चिंचवडकरांकडून व्यक्त केली जात आहे.**

| - नद्यांची लांबी - | नदी सुधार प्रकल्पातील प्रमुख अडथळे असे आहेत... |
|---|---|
| पवना 24.40 कि.मी. (दोन्ही काठ शहर हद्दीत) | # राज्याच्या पर्यावरण विभागाचा ना हरकत दाखला |
| इंद्रायणी 20.60 कि.मी. (एक काठ शहरात 1.80 कि.मी. अंतर आळंदी हद्दीत) | # सांडपाणी प्रकिया प्रकल्पांबाबत महापालिका उदासीन |
| मुळा 14 कि.मी. (एक काठ शहरात) | # 'डीपीआर'ला केंद्र सरकारच्या मंजुरीची प्रतीक्षा |
| | # निळ्या पुररेषेत झालेली बेकायदा बांधकामे |
| | # महापालिका, जिल्हा परिषद, पीएमआरडीए, पाठबंधारे आणि राज्य सरकारच्या विविध विभागांमधील समन्वयाचा अभाव |

### सांडपाणी प्रकल्पाबाबत राज्य सरकारच्या निर्देशाला केराची टोपली?



नदीकाठच्या परिसरात दोन्ही तीरावर रहिवासी सोसायट्या, व्यापारी संकुले, हॉटेल, विविध गॅरेज, रसायनयुक्त पाणी सोडणारे उद्योग आहेत. सांडपाणी, मैलामिश्रित पाणी याचे पूर्णपणे शुद्धीकरण केले जात नाही. या नदीवर काही बंधारे होते, ते तोडून नदीची रुंदी कमी केली गेली आणि त्यामुळे नदीला गटारीचे स्वरूप आले. घनकचरा, राडारोडा, नदीकाठी केलेली अतिक्रमणे, जलपर्णी आदींमुळे नदीचे पात्र अरुंद झाले आहे. प्रत्येक प्रभागात सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभे करून नदी प्रदूषण रोखण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. याबाबत नागपूर येथील डिसेंबर-२०२३ मध्ये हिवाळी अधिवेशनात मंत्रीमहोदय यांनी महापालिका प्रशासनाला निर्देश दिले आहेत. परंतु, प्रशासनाची भूमिका उदासीन आणि राजकीय नेते हतबल आहेत, असे चित्र आहे.

दरम्यान, नदी काठच्या गावातील मैला मिश्रित सांडपाणी तसेच कारखान्यातील रसायन युक्त सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते सांडपाणी नदी पात्रात सोडले जाते.

यामुळे इंद्रायणी नदी वारंवार फेसाळलेली दिसून येत आहे. आज दि.6 रोजी सुद्धा इंद्रायणी नदी जलप्रदूषणामुळे फेसाळलेली दिसून येत होती.

मोशी येथील बंधाऱ्यातून इंद्रायणी नदीपात्रात पडलेल्या पाण्याने तेथील नदीपात्र मोठ्या प्रमाणात फेसाळलेले दिसून आले. तेथील नदीपात्रातील पाण्यावर पांढरा शुभ्र फेस तरंगल्याने तो बर्फ असल्याचा भास निर्माण होऊन तिने हिम नदी चे स्वरूप धारण केल्यासारखे वाटत होते.या फेसळलेल्या नदीपात्राचे व्हिडिओ आज सोशल मीडियावर व्हायरल झाले होते.

जलप्रदूषणा मुळे इंद्रायणी नदी वारंवार फेसाळलेली दिसून येत आहे. जलप्रदूषणा मुळे नदी लगत असणाऱ्या छोट्या मोठ्या कुपनलिकेवर परिणाम होत आहेत. त्यांचे देखील जल प्रदूषित होत आहे. नदी काठच्या गावांना सुध्दा ह्या जलप्रदूषीत पाण्याचा पाणीपुरवठा होत असल्याने तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच नदीपात्रातून शेतपंपा द्वारे विविध पिकांना हे पाणी दिले जाते.ती पिके मानवासह पशु पक्षी व इतर प्राणी त्याचा अन्न म्हणून वापर करतात. दुरोगामी विचार करता त्या पिकांमुळे आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. जलप्रदूषीत पाण्यामुळे विविध त्वचारोग ही मनुष्यास संभवतात.

इंद्रायणी नदीपात्र वारंवार जलप्रदूषणाने फेसाळलेले दिसून येत आहे.हे जलप्रदूषण करणाऱ्यांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कठोर कारवाई करावी.अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### नदी सुधार योजना कागदावरच...

पवना व इंद्रायणी नदी सुधार योजनेसाठी 2 हजार 756 कोटी खर्च अपेक्षित आहे. योजना पालिकेने स्वत: राबवायची की इतर माध्यमातून हे अद्याप निश्चित झालेले नाही. पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर केंद्र व राज्य शासनाकडे अनुदानासाठी मागणी केली जाणार आहे. योजना खासगी भागीदारीतून पीपीपी तत्वावर राबविण्याचा पर्यायावरही विचार केला जात आहे. पहिल्या टप्प्यासाठी कर्जरोख्यांची विक्रीतून 200 कोटीचा निधी उभारण्यात येणार आहे. दरम्यान, मुळा नदी योजनेसाठी पुणे महापालिकेस खर्चासाठी पिंपरी-चिंचवड पालिका 750 कोटी देणार आहे. याबाबत वारंवार चर्चा झाली. मात्र, सदर नदी सुधार योजना केवळ कागदावच पहायला मिळत आहे. त्यामुळे 'श्रद्धास्थान' असलेल्या नद्या अगदी अंतिम घटका मोजत आहेत. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी 'स्मार्ट सिटी... ग्रीन सिटी'ची स्वप्ने रंगवीत आहेत, असे चित्र सध्या पहायला मिळत आहे.

# ठाकरेंनी मला मंत्रीपद दिलं नाही!

## कमी पैसे दिले म्हणून मंत्री पद मिळू शकले नाही : केसरकर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मातोश्रीमधून माझ्याकडे मंत्री पदासाठी कोट्यावधी रुपयांची मागणी करण्यात आली होती मात्र मी एक कोटी रुपये दिले. कमी पैसे दिले म्हणून मला मंत्री पद मिळू शकले नाही असा गौप्यस्फोट राज्याचे शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी पत्रकार परिषदेत केला. सावंतवाडी येथील पत्रकार परिषदेत त्यांनी हा गौप्यस्फोट केला.**



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सावंतवाडी येथील संवाद कार्यक्रमात केलेल्या आरोपांचे खंडन करत केसरकर म्हणाले, 50 कोटीच काय एक रुपया जरी घेतला असल्याचे सिद्ध केल्यास तर राजीनामा देईन असे सांगितले. मंत्री पद देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी माझ्याकडे कोट्यावधी रुपयांची मागणी केली होती, मात्र एकनाथ शिंदे यांनी एक रुपया न घेता मंत्रीपद दिले असल्याचा गौप्यस्फोट केसरकर यांनी केला. मी अनेक पक्ष नेत्यांसोबत काम केले आहे, उद्धव ठाकरे यांचा मी मान ठेवला होता मात्र त्यांनी माझ्या मतदारसंघात येऊन माझ्या विरोधात आरोप केले. साईबाबांच्या श्रद्धा, सबुरी बद्दल ते बोलले हे चुकीचे असल्याचे केसरकर यावेळी म्हणाले. नारायण राणे हे सिंधुदुर्ग वासियांसाठी देव होते. त्यावेळी तुमच्या गाडीत भरायला पेट्रोल आणि राहण्यासाठी हॉटेल मिळत नव्हते तर श्याम सावंत सोडले तर त्यांच्यासोबत गेलेले सर्व आमदार त्यांनी पुन्हा निवडून आणले आणि त्यांच्यावर तुम्ही टीका करता हे चूकीचे असल्याचेही ते म्हणाले. नारायण राणे हे शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष एक नंबरला होता तर दोन नंबरला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि तीन नंबरला शिवसेना होती या शिवसेनेकडे चाळीस हजार मते होती मात्र हे मताधिक्य आपण एक लाख वीस हजार पर्यंत आणले यामध्ये खारीपेक्षाही मोठा वाटा माझा होता हे त्यांनी कबूल करावे .तुमचे आमदार खासदार निवडून आणण्यासाठी माझा जास्त वाटा असल्याचे ते म्हणाले. आमदार गणपत गायकवाड यांनी केलेल्या कोट्यावधी रुपयांच्या मुख्यमंत्र्यावरील रकमेबाबत बोलताना ते म्हणाले जर कोट्यावधी रुपये दिले होते तर ते यापूर्वी गणपत गायकवाड यांनी का मागितले नाही. जेव्हा त्यांना अटक झाली तेव्हा हे बिनबुडाचे आरोप केले जात असून यात काही तथ्य नसल्याचे ते म्हणाले. उद्धव ठाकरे हे माझ्यासारख्या सज्जन माणसाच्या अंगावर जात असून हे येथील जनता कधीही सहन करणार नाही. त्याचबरोबर कोकणातील दौऱ्यामध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नाव घेऊन त्यांचा अवमान करत आहेत.

तुम्ही घेतलेले निर्णय शरद पवार यांच्या सांगण्यावरून घेतले त्यामुळे तुमच्यावर ही वेळ आली असल्याचे केसरकर म्हणाले. माझी लढाई नारायण राणे यांच्याशी व्यक्तिगत नसल्यामुळे आमचे दोघांचे एकमेकांशी जुळले आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सावंतवाडी येथील संवाद कार्यक्रमात केलेल्या आरोपांचे खंडन करत केसरकर म्हणाले, 50 कोटीच काय एक रुपया जरी घेतला असल्याचे सिद्ध केल्यास तर राजीनामा देईन असे सांगितले. मंत्री पद देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी माझ्याकडे कोट्यावधी रुपयांची मागणी केली होती, मात्र एकनाथ शिंदे यांनी एक रुपया न घेता मंत्रीपद दिले असल्याचा गौप्यस्फोट केसरकर यांनी केला. मी अनेक पक्ष नेत्यांसोबत काम केले आहे, उद्धव ठाकरे यांचा मी मान ठेवला होता मात्र त्यांनी माझ्या मतदारसंघात येऊन माझ्या विरोधात आरोप केले. साईबाबांच्या श्रद्धा, सबुरी बद्दल ते बोलले हे चुकीचे असल्याचे केसरकर यावेळी म्हणाले.

### राणे सिंधुदुर्ग वासियांसाठी देव होते


» नारायण राणे हे सिंधुदुर्ग वासियांसाठी देव होते. त्यावेळी तुमच्या गाडीत भरायला पेट्रोल आणि राहण्यासाठी हॉटेल मिळत नव्हते तर श्याम सावंत सोडले तर त्यांच्यासोबत गेलेले सर्व आमदार त्यांनी पुन्हा निवडून आणले आणि त्यांच्यावर तुम्ही टीका करता हे चूकीचे असल्याचेही ते म्हणाले.नारायण राणे हे शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष एक नंबरला होता तर दोन नंबरला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि तीन नंबरला शिवसेना होती या शिवसेनेकडे चाळीस हजार मते होती मात्र हे मताधिक्य आपण एक लाख वीस हजार पर्यंत आणले यामध्ये खारीपेक्षाही मोठा वाटा माझा होता हे त्यांनी कबूल करावे .तुमचे आमदार खासदार निवडून आणण्यासाठी माझा जास्त वाटा असल्याचे ते म्हणाले.

# शिवसागरच्या बॅकवॉटर परिसरात पर्यटन विकासाला चालना

## शासकीय गुपिते कायदा 1923 मध्ये राज्य शासनाने अंशत: बदल

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सातारा जिल्हा नियोजन समितीमार्फत (डीपीसी) राज्य शासनाकडे कोयना धरण परिसरातील मुनावळे या गावी जलपर्यटन विकसित करण्याचा प्रस्ताव सन २०२२ मध्ये पाठविण्यात आला होता. त्याला राज्य शासनाच्या शिखर समितीने मान्यता दिली होती. या प्रकल्पाचे बांधकाम हे कृष्णा खोरे विकास महामंडळाद्वारे करण्यास शासनाने मान्यता दिली आहे, तर हा प्रकल्प एमटीडीसी चालविणार आहे.**



पर्यावरणाची हानी होणार नाही, तसेच जल पर्यटन श्रेत्रात कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. तसेच पर्यावरणस्नेही बोटींचा वापर करण्यात यावा, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. पर्यटकांसाठी नियमानुसार आवश्यक त्या विमा सवलती आणि वैद्यकीय सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. याबाबतचा शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक विभागाचे उपसचिव संतोष रोकडे यांनी प्रसृत केला. कोयना धरण किंवा शिवसागरच्या बॅकवॉटर परिसरात पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी शासकीय गुपिते कायदा १९२३ मध्ये राज्य शासनाने अंशत: बदल केला आहे. या सुधारणेमुळे धरण आणि आजूबाजूच्या सात कि.मीपर्यंतच्या क्षेत्राला प्रतिबंधित क्षेत्र म्हणून अबाधित ठेवून उर्वरित जलाशयाचा ८० कि.मीचा परिसर पर्यटनदृष्ट्या विकसित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून जावळी तालुक्यातील मुनावळे येथे जागतिक दर्जाचे जलपर्यटन विकसित करण्याचे शासनाचे नियोजन आहे. त्यासाठी ४५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. कोयना धरण परिसरात जंगले, सह्याद्री डोंगररांगा, निळेशार पाणी असे निसर्गाचे वरदान लाभलेले आहे. शिवसागर जलाशयात जलपर्यटन विकसित करण्यासाठी मोठी संधी आहे. त्यामुळे स्थानिक युवकांना रोजगार संधी निर्माण होईल आणि स्थानिक अर्थव्यवस्था विकसित होऊ शकणार आहे. पर्यावरणाची हानी होणार नाही, तसेच जल पर्यटन श्रेत्रात कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. तसेच पर्यावरणस्नेही बोटींचा वापर करण्यात यावा, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. पर्यटकांसाठी नियमानुसार आवश्यक त्या विमा सवलती आणि वैद्यकीय सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. याबाबतचा शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक विभागाचे उपसचिव

### पर्यटन विकासाला चालना

» कोयना धरण किंवा शिवसागरच्या बॅकवॉटर परिसरात पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी शासकीय गुपिते कायदा १९२३ मध्ये राज्य शासनाने अंशत: बदल केला आहे. या सुधारणेमुळे धरण आणि आजूबाजूच्या सात कि.मीपर्यंतच्या क्षेत्राला प्रतिबंधित क्षेत्र म्हणून अबाधित ठेवून उर्वरित जलाशयाचा ८० कि.मीचा परिसर पर्यटनदृष्ट्या विकसित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून जावळी तालुक्यातील मुनावळे येथे जागतिक दर्जाचे जलपर्यटन विकसित करण्याचे शासनाचे नियोजन आहे.

# कुणबी प्रमाणपत्रासाठी भोसरीत मोहीम!

## मराठा बांधवांनी अर्ज करावेत : आमदार महेश लांडगे यांचे आवाहन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणाचा लढा यशस्वी झाला असून, महायुती सरकारच्या माध्यमातून मराठा बांधवांसाठी कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी भोसरी विधानसभा मतदार संघात महसूल विभागाच्या वतीने मोहीम हाती घेतली आहे. त्यामध्ये सहभागी होत मराठा बांधवांनी विहीत अर्ज दाखल करावेत आणि कुणबी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.**



राठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी केलेल्या आंदोलन आणि उपोषणामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला मराठा आरक्षणाचा निर्णय राज्य सरकारने घेतला. महायुती सरकारच्या माध्यमातून कोणत्याही समाजाला न दुखावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची भूमिका घेण्यात आली. त्यामुळे राज्यात कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत महसूल विभागाने मोहीम सुरू केली आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघातील गावनिहाय सर्व्हेक्षण आणि कुणबी प्रमाणपत्रासाठी कागदपत्रे सादर करण्याचे नियोजन महसूल विभागाने केले आहे. त्यामुळे अधिकाधिक मराठा बांधवांना आरक्षणाला लाभ घेण्यासाठी मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> **“ भोसरी विधानसभा मतदार संघात महसूल विभागाच्या माध्यमातून कुणबी प्रमाणपत्र वाटप मोहीम सुरू आहे. त्यासाठी अधिकाधिक मराठा बांधवांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून आरक्षणाचा लाभ घ्यावा. गरजवंत मराठा समाजबांधवांना त्यामुळे शासनाच्या विविध योजना, सवलतींचाही फायदा होणार आहे.**
>
> \- **महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### आवश्यक कागदपत्रे पुढीलप्रमाणे...

»अर्ज स्व. घोषणापत्र व फोटो, लाभार्थी व अर्जदार (वडील) यांचा शाळा सोडल्याचा दाखला, वडीलांचे जातप्रमाणपत्र असल्यास दोघांचे आधारकार्ड, आजोबांचा शाळा सोडल्याचा दाखला, सन १९६७ पूर्वीचे हवेलीतील कायमस्वरुपी वास्तव्याचे कुणबी जात नमूद महसुली पुरावे (सातबारा, कडईपत्र, वारस फेरफार गाव नमुना नं. १४ किंवा सन १९६७ पूर्वीचे हवेलीतील रक्तनाते संबंधातील कुणबी जात नमुद पुरावा जोडणे उदा. सख्खे/चुलत-चुलते आत्या, आजोबा, पणजोबा, खापरपणजोबा इ.), वंशावळ, मोडीलिपी असल्यास मोडीलिपी भाषांतर, नागरिक सुविधा केंद्रातील २ प्रतिज्ञापत्र, रहिवास पुरावा- चालू वीजदेयक (लाईटबील), शिधापत्रिका (रेशनकार्ड), जात पडताळणी (VALIDITY) प्रमाणपत्र अशी आवश्यक कागदपत्रांची यादी आहे.

### मतदार संघातील शिबिराचे गावनिहाय वेळापत्रक :

»मोशी : दि. ६ फेब्रुवारी २०२४ : सकाळी ११ वाजता. स्थळ : श्री. नागेश्वर मंदिर. तळवडे : दि. ६ फेब्रुवारी २०२४ : दुपारी ३ ते सांयकाळी ५ पर्यंत. स्थळ : मारुती मंदिर, गावठाण. चिखली : दि. ६ फेब्रुवारी २०२४ : संकाळी ११ ते दुपारी २ , स्थळ : गणेश मंदिर, बसस्टॉप. डुडूळगाव : दि. ८ फेब्रुवारी २०२४, सकाळी ११ वा. स्थळ : श्री अडबंगनाथ मंदिर. चऱ्होली : दि. ९ फेब्रुवारी २०२४, सकाळी ११ वाजता. स्थळ : तलाठी कार्यालय, गावठाण. भोसरी : दि. ९ फेब्रुवारी २०२४, सकाळी ११ वाजता, स्थळ : तलाठी कार्यालय. तसेच, दि. ९ तारखेनंतरही इच्छुकांना तलाठी कार्यालयांमध्ये माहिती उपलब्ध होईल आणि अर्ज अप्पर तहसील कार्यालयात दाखल करता येणार आहेत.

---

# चारचाकी वाहनांसाठी ‘गोल्डन नंबर’

## आगाऊ अर्ज करण्याची सुविधा : प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची माहिती

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**चारचाकी वाहनांसाठी सुरु होणाऱ्या ‘एलजे’ या नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक शुल्क भरुन राखून ठेवण्याकरिता आगाऊ अर्ज करण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.**




प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे लवकरच चारचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. ज्यांना खाजगी चारचाकी वाहनांसाठी आकर्षक तसेच पसंतीचा क्रमांक विहित शुल्क भरुन हवा असेल त्यांनी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. हा अर्ज आणि धनाकर्ष (डीडी) ७ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० दरम्यान कार्यालयाच्या परिवहन विभागात पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः जमा करणे आवश्यक राहील. चारचाकी वाहन क्रमांकाची यादी ८ फेब्रुवारी रोजी कार्यालयीन सूचनाफलकावर लावण्यात आल्यानंतर अर्जदारांनी लिलावासाठी जास्त रक्कमेचा एकच डीडी दुपारी २.३० वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात घालून जमा करावा. डीडी ‘डीवाय. आर.टी.ओ. पिंपरी-चिंचवड’या नावाने राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेचा पुणे येथील असावा. त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता लिफाफे उघडून जास्तीत जास्त रकमेचा धनाकर्ष सादर केलेल्या अर्जदारास पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

३० दिवसांची कालमर्यादा...

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व भरलेले शुल्क शासनाच्या तिजोरीत जमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही. आकर्षक क्रमांकाचे शुल्क बदल झाल्यास त्यावेळी विहीत करण्यात आलेले शुल्क लागू राहील, असेही पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

# संविधान सभेत ‘हूल जोहार’




**संविधान सभेत वेगवेगळय़ा पार्श्वभूमीतून आलेले सदस्य होते. त्यापैकी एक महत्त्वाचे नाव होते जयपाल सिंग मुंडा. संविधान सभेमध्ये मुंडा आले ते बिहार प्रांतामधून (आताचे झारखंड). ते स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडून आले होते.**

रांचीपासून ३० किलोमीटर दूर असलेल्या खुंटीमधील टकरी या छोटय़ाशा गावात त्यांचा १९०३ साली मुंडा जमातीमध्ये जन्म झाला. प्राथमिक शिक्षण पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी ऑक्सफर्डमधल्या सेंट जॉन्स कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. या काळात त्यांनी विविध क्षेत्रांत गती प्राप्त केली. येथे असतानाच त्यांनी हॉकीमध्ये प्रावीण्य मिळवले. पुढे त्यांची निवड भारतीय नागरी सेवा (आयसीएस) अधिकारी म्हणून झाली. १९२८ साली ॲमस्टरडॅम येथे ऑिलपिक सामने होते. भारतीय हॉकी टीमचे कर्णधारपद स्वीकारावे, अशी विनंती त्यांना करण्यात आली. तेव्हा मुंडा हे भारतीय नागरी सेवेत प्रोबेशनवर होते त्यामुळे त्यांना रजा देता येणार नाही, असे सांगण्यात आले. मुंडा यांनी कशाचाही विचार न करता नोकरी सोडली आणि हॉकी संघाचे कर्णधारपद स्वीकारले. त्यावर्षी भारतीय हॉकी संघाने ऑिलपिकमधील सुवर्णपदक प्राप्त केले. ऑिलपिकमध्ये देशाने



मिळवलेले हे पहिले सुवर्णपदक! या ऑिलपिक सामन्यांनंतरही नागरी सेवेत रुजू होण्याचा पर्याय ब्रिटिशांनी त्यांच्या समोर ठेवला होता. मुंडा यांनी तो पर्याय नाकारला आणि आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. १९३८ साली आदिवासी महासभा स्थापन झाली होती. १९३९ साली या महासभेच्या अध्यक्षस्थानी त्यांची निवड झाली. येथून त्यांच्या नेतृत्वात आदिवासींचे मूलभूत प्रश्न तीव्रतेने मांडण्यास सुरुवात झाली. स्वत: आदिवासी असल्याने अनेक वेळा त्यांनी भेदभावाचा सामना केला होता. आदिवासींचे कसे शोषण केले जाते, हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते, अनुभवले होते. त्यांनी ब्रिटिशांना आणि काँग्रेसला आदिवासी प्रश्न समजावून सांगितला. आदिवासींमधील लोकप्रियता वाढल्याने त्यांना ‘मरांग गोमके’ ( सर्वोच्च नेता) असे म्हटले जाऊ लागले. संविधान सभेत त्यांचा प्रवेश झाला तेव्हा मूलभूत हक्कांबाबत असलेली सल्लागार समिती तसेच अल्पसंख्याकांकरता आणि आदिवासींकरता असलेल्या समितीमध्ये त्यांचा समावेश झाला. मुंडा यांनी केलेली मांडणी ही तेव्हाच्या संविधान सभेत सर्वांना चक्रावून टाकणारी होती. आपण सिंधू संस्कृतीचे वंशज असून हजारो वर्षांपासून सर्वाधिक अन्याय आदिवासींवर झाला आहे, हे सांगतानाच ते म्हणाले, आदिवासींना लोकशाही प्रक्रिया शिकवण्याचा तुम्ही लोक प्रयत्न करत आहात; मात्र मुळातच लोकशाही प्रक्रियेनुसार जगणारे लोक आदिवासी जमातीमधील आहेत. आदिवासींना लोकशाही शिकवण्याऐवजी तुम्ही आदिवासींकडून लोकशाही मूल्ये शिकली पाहिजेत, असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. संविधान सभेतील अनेकांसाठी मुंडा यांच्या मांडणीने सांस्कृतिक धक्का बसला मात्र वादविवादात आदिवासींबाबतचे मूलभूत प्रश्न मुंडा मांडू शकले, हे विशेष. अश्विनी कुमार पंकज यांनी संपादित केलेल्या ‘आदिवासीडम’ (२०१७) या पुस्तकात जयपाल सिंग मुंडा यांचे निवडक लेख आणि भाषणे आहेत. जयपाल सिंग यांनी स्वातंत्र्योत्तर काळातही महत्त्वाची भूमिका बजावली. मुख्य म्हणजे जल, जंगल आणि जमिनीसोबतचे आपले पूर्वीपासूनचे नाते सांगत जयपाल सिंग आयुष्यभर आदिवासींचे प्रश्न मांडत राहिले. जसिंता केरकेट्टा नावाची कवयित्री म्हणते,रांचीपासून ३० किलोमीटर दूर असलेल्या खुंटीमधील टकरी या छोटय़ाशा गावात त्यांचा १९०३ साली मुंडा जमातीमध्ये जन्म झाला. प्राथमिक शिक्षण पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी ऑक्सफर्डमधल्या सेंट जॉन्स कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. या काळात त्यांनी विविध क्षेत्रांत गती प्राप्त केली. येथे असतानाच त्यांनी हॉकीमध्ये प्रावीण्य मिळवले. पुढे त्यांची निवड भारतीय नागरी सेवा (आयसीएस) अधिकारी म्हणून झाली. १९२८ साली ॲमस्टरडॅम येथे ऑिलपिक सामने होते. भारतीय हॉकी टीमचे कर्णधारपद स्वीकारावे, अशी विनंती त्यांना करण्यात आली.

## संपादकीय »

### राजमान्यता ?

***निवडणुका आल्या की अनेक देशप्रमुखांस आपली लष्करी मर्दानगी प्रदर्शित करण्याची खुमखुमी येते.***

निवडणुका आल्या की अनेक देशप्रमुखांस आपली लष्करी मर्दानगी प्रदर्शित करण्याची खुमखुमी येते. ती भागवण्याची संधी ते शोधतच असतात. अमेरिकेचे निवडणुकांक्षी अध्यक्ष जो बायडेन यांस तशी संधी नुकतीच सापडली. जॉर्डनमधील अमेरिकी तळावर इराकातून कथित इराण-पुरस्कृत दहशतवाद्यांनी ड्रोन हल्ला केला ही ती संधी. या कथित इराण-प्रेरित हल्ल्यात अमेरिकेच्या चार जवानांस मरण आले. ते निमित्त बायडेन यांनी साधले आणि इराण-पुरस्कृत हूथी बंडखोरांच्या तळांवर अमेरिकेने बॉम्बहल्ले केले. हे केवळ अमेरिकी हल्ल्यामागे इराण आहे या संशयावरून घडले. अमेरिकी तळावरील हल्ल्यात इराणचा हात आहे, याचा कोणताही सबळ पुरावा यात अद्याप समोर आलेला नाही. तरीही अमेरिकेने हे प्रत्युत्तर दिले पश्चिम आशियाच्या वाळवंटाचा आधीच रक्तरंजित चिखल झालेला आहे. गाझा पट्ट्यातील इस्रायली दमनशाही अद्याप थंडावलेली नाही.

**नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अंतरिम अर्थसंकल्पात मोदी सरकारची दूरदृष्टी प्रतिबिंबित झाली आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला जगात तिसऱ्या स्थानी आणण्याचे स्वप्न पाहतानाच या विकासाची फळे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याची काळजीही घेण्यात आली आहे..**

## अर्थसंकल्पातून भविष्याची मुहूर्तमेढ

देशाचे पंतप्रधानपद भूषविणाऱ्या व्यक्तीकडे भविष्यवेधी दृष्टिकोन असणे गरजेचे असते. पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे तो आहे. सरकारच्या आजवरच्या ध्येयधोरणांत तो प्रतिबिंबित होत आला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर- आगामी २५ वर्षांचा कालखंड हा विकासाच्या दृष्टीने ‘अमृतकाल’ असेल, असे पंतप्रधान म्हणाले होते. भारताला जगभरातील पहिल्या पाच देशांच्या पंक्तीत स्थान मिळवून देण्यासाठी काय करावे लागेल, याचा नियोजनबद्ध आराखडा त्यांनी या संकल्पनेतून देशापुढे ठेवला आहे. नुकत्याच सादर झालेल्या अंतरिम अर्थसंकल्पातही ही भविष्यवेधी दृष्टी प्रतिबिंब झाली. गेल्या १० वर्षांत सरकारच्या माध्यमातून घेण्यात आलेले निर्णय पाहता, ‘विकसित भारत’ या संकल्पनेविषयीचा त्यांचा दृढ आत्मविश्वास जाणवतो. अलीकडेच सुरू झालेल्या विकसित भारत संकल्प यात्रेत सरकारच्या कल्याणकारी योजनांचा लाभ किती जणांपर्यंत



पोहोचला आहे आणि अद्याप हे लाभ आणखी किती जणांपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे, हे स्पष्ट होत आहे.सरकारने देशाला पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनविण्यासाठी कंबर कसली आहे. हे उद्दिष्ट साध्य केल्यानंतर भारताचा जगातील तीन बलाढय़ आर्थिक महाशक्तींमध्ये समावेश होईल. ते ध्येय समोर ठेवूनच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अंतरिम अर्थसंकल्पाची आखणी केल्याचा प्रत्यय त्यांनी विविध क्षेत्रांसाठी केलेल्या तरतुदींतून येते. या अर्थसंकल्पाने आर्थिक प्रगतीसोबतच सर्वसमावेशक विकासाला प्राधान्य देऊन सरकारची धोरणे जनकेंद्री असल्याचे दाखवून दिले आहे. आणखी दोन-तीन महिन्यांनी लोकसभा निवडणूक होणार आहेत. निवडणुकीपूर्वी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात सामान्यपणे अनेक लोकप्रिय घोषणा करण्यात येतात. मात्र, या अंतरिम अर्थसंकल्पात अशा कोणत्याही घोषणा करण्यात आलेल्या नाहीत. राजकोषीय तुटीचे लक्ष्य अपेक्षेपेक्षा चांगले आहे. ही तूट पुढील आर्थिक वर्षांसाठी ५.१ टक्के ठेवण्याचे मोदी सरकारचे लक्ष्य आहे. यातून खासगी क्षेत्राचा भांडवली खर्च लक्षणीय प्रमाणात वाढेल. पायाभूत सुविधांसाठीची ११.१० लाख कोटींची तरतूद सरकारच्या धोरण सातत्याचा प्रत्यय देणारी आहे. भांडवली खर्चाची ही विक्रमी तरतूद रोजगाराच्या अनेक संधी निर्माण करणारी ठरणार आहे. ग्रामीण रोजगार योजनेसाठीची तरतूद ४३ टक्क्यांनी वाढवून ८६ हजार कोटी एवढी करण्यात आली आहे. कर आणि शुल्काबाबत कोणतेही मोठे बदल करण्यात आलेले नाहीत. यामुळे बाजारात जेवढे स्थैर्य राहील, तेवढा व्यवसायांना लाभ होईल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कुणाला सांगताय म्हातारा झालोय?

## शरद पवारांचा जुना व्हिडीओ शेअर करत भावनिक साद

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कुणाला सांगताय म्हातारा झालोय? तुम्हाला काय ठाऊक आहे अजून जोपर्यंत तुमची साथ आहे तोपर्यंत हे गाडं थकणार नाही, थांबणार नाही, हे शब्द आहे पवारांचे. पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाला मिळाल्यानंतर शरद पवार गटाकडून त्यांचा एक जुन्हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओच्या माध्यमातून शरद पवार गटाने कार्यकर्त्यांना भावनिक साद घातल्याचं दिसून आलंय.**



शरद पवारांचा हा व्हिडीओ दोन वर्षांपूर्वीचा आहे. त्यावेळीही त्यांच्यावर वय झाल्याची टीका करण्यात येत होती, आताही करण्यात येतेय. वेगळा सवतासुभा मांडल्यानंतर अजित पवारांनी तर त्यांच्या वयावरून अनेकदा वक्तव्यं केली आहे. वरिष्ठांनी निवृत्ती घ्यावी आणि मार्गदर्शन करावं असं त्यांनी म्हटलं होतं. आता निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर शरद पवार गटाला मोठा धक्का बसल्याचं दिसून येतंय. अजित पवार गटाकडून मोठा जल्लोष करण्यात येत आहे. त्यानंतर आता शरद पवार गटाकडून जुन्या व्हिडीओच्या माध्यमातून उत्तर देण्यात आलं आहे. या व्हिडीओमध्ये शरद पवार म्हणतात की, मी आता 80-82 वर्षांचा झालोय असं सांगता, कुणाला सांगताय म्हातारा झालोय. तुम्हाला काय ठाऊक आहे अजून. तुम्ही काय त्याच्या खोलात जाऊन पाहिलंय. जोपर्यंत तुम्हा लोकांची साथ आहे, तोपर्यंत हे गाडं थकणार नाही, थांबणार नाही. 2022 च्या व्हिडrओत साहेबांचं जे म्हणणं आहे ते आजही तंतोतंत तसंच आहे. कारण, त्यानंतर अनेक राजकीय वादळं आली तरीही हा मनुष्य खचत नाही, साहेबांची इच्छाशक्ती अजूनही प्रचंड आहे. कोणत्याही संकटाला ते आजही निधड्या छातीने सामोरं जातात, म्हणूनच ते आमचे साहेब आहेत!!कुणाला सांगताय म्हातारा झालो, तुम्हाला काय ठाऊक आहे? तुमची साथ आहे तोपर्यंत हे गाडं थकणार नाही, थांबणार नाही. शरद पवारांनी २०२२ मध्ये एक भाषण केलं होतं. त्यातला व्हिडीओ पोस्ट करुन राष्ट्रवादी काँग्रेसने हा व्हिडीओ शेअर केला आहे. आज निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवारांचा आहे असा निर्णय दिला. तसंच घड्याळ हे चिन्हही अजित पवारांनाच दिलं आहे. त्यानंतर शरद पवार गटाकडून भावनिक साद घालण्यात आली आहे.शरद पवार यांचा जो व्हिडीओ पोस्ट करण्यात आला आहे तो २०२२ मधला आहे. वय झालं अशी टीका त्यावेळीही त्यांच्यावर झाली होती. ज्यानंतर उत्तर म्हणून हे भाषण शरद पवार यांनी दिलं होतं. त्यात मी थकणार नाही म्हटलं होतं. अजित पवार आणि शरद पवार असे दोन गट पडल्यानंतर अजित पवार यांनीही शरद पवार यांचं वय झाल्याचा मुद्दा मांडला होता. त्यानंतर शरद पवार यांनीही अजित पवारांना जोरदार प्रत्युत्तर दिलं होतं. आता निवडणूक आयोगाचा निकाल आल्यानंतर दोन वर्षांपूर्वीचा व्हिडीओ पोस्ट करत राष्ट्रवादीने भावनिक आवाहन केलं आहे.या व्हिडीओत शरद पवार म्हणाले होते, "मी आता ८०-८२ वर्षांचा झालोय असं सांगता, कुणाला सांगताय म्हातारा झालोय. तुम्हाला काय ठाऊक आहे अजून. तुम्ही काय त्याच्या खोलात जाऊन पाहिलंय. जोपर्यंत तुम्हा लोकांची साथ आहे, तोपर्यंत हे गाडं थकणार नाही, थांबणार नाही." त्यानंतर राष्ट्रवादीने म्हटलंय की '२०२२च्या व्हिडिओत साहेबांचं जे म्हणणं आहे ते आजही तंतोतंत तसंच आहे. कारण, त्यानंतर अनेक राजकीय वादळं आली तरीही हा मनुष्य खचत नाही, साहेबांची इच्छाशक्ती अजूनही प्रचंड आहे. कोणत्याही संकटाला ते आजही निधड्या छातीने सामोरं जातात.

### शरद पवारांचा व्हिडीओ 2022 चा

» संकट आलं की जे मुखवटे घातलेले कोण आणि खरे कोण? ते कळतं. सगळं देऊनही ज्यांची लाळ गळत असते ते लाळघोटे आज भाजपासह गेले आहेत असंही उद्धव ठाकरे चिपळूणच्या सभेत म्हणाले.चिपळूणमधले धरणं फोडणारे खेकडे एकत्र गेले आहेत. खेकडा तिरकाच चालणार, त्याचं काय करायचं तुम्हाला माहीत आहे. आज सोमवार आहे खेकड्याला सोडून द्या आज. अमावस्या, पौर्णिमा कधी आहे ते बघा असा टोलाही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. आपण सर्वोच्च न्यायालयात गेलो आहोत. न्याय मिळेल अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाकडून आहे. आज माझे हात रिकामे आहेत, तरीही तुम्ही सगळे आलात. एकही माणूस भाड्याने आणलेला नाही. सरकार आपल्या दारी म्हणत काही लोक येतात, त्यांच्या कार्यक्रमात अर्ध्या खुर्च्याही रिकाम्या असतात.भारतीय जनता पक्ष असं मी सभ्यपणे बोलतोय. बाळासाहेबांचे विचार सोडले असं जे म्हणतात त्यांना मी कमळाबाई म्हणतो. कमळाबाई शब्द बाळासाहेबांनी दिला. मी घराणेशाहीवाला आहे, बाळासाहेबांचे विचार माझ्याकडे आहेतच. पंतप्रधान घराणेशाहीच्या विरोधात जे टाहो फोडत आहेत त्यांना प्रश्न आहे २०१४ मध्ये मीच पक्षप्रमुख होतो, आत्ताचे जे सांगत आहेत की हे पक्षप्रमुखच नाहीत. मग तुम्ही पाठिंबा कुणाचा घेतला होता? २०१९ मध्ये मला तुम्ही का बोलवलं होतं? अमित शाह यांनी मला का बोलवलं होतं? अमित शाह मातोश्रीवर का आले होते? मिंध्याकडे का गेला नाहीत ? तोपर्यंत यांना माहीत होतं की हा पक्षप्रमुख आहे.

---

# न्याय मागण्यासाठीआम्ही निवडणूक आयोगाकडे गेलो!

## निकाल विनम्रपणे स्वीकारत असल्याचं अजित पवार म्हणाले

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीप्रकरणी निवडणूक आयोगाने आज मोठा निर्णय घेतला आहे. अजित पवार गटच मुख्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचं आज (६ फेब्रुवारी) निवडणूक आयोगाने स्पष्ट केलं. या निकालानंतर अजित पवारांनी माध्यमांशी संवाद साधला. निवडणूक आयोगाने लावलेला निकाल विनम्रपणे स्वीकारत असल्याचं अजित पवार म्हणाले.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बाजूला होत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपला वेगळा गट स्थापन केला. जुलै २०२३ मध्ये अजित पवार यांनी एनडीएत सामील होण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणाचा? यावर निवडणूक आयोगामध्ये सुनावणी सुरू होती. दोन्ही बाजूंनी आपापली कायदेशीर बाजू मांडण्यात आली. अखेर निवडणूक आयोगाने जो निर्णय शिवसेना यांच्याबाबत घेतला होता. तसाच निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसबाबत दिल्याचे दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि त्याचे चिन्ह हे अजित पवार यांच्याकडे असेल असा निर्णय निवडणूक आयोगाने नुकताच दिला. या निर्णयावर आता दोन्ही गटाकडून प्रतिक्रिया देण्यात येत





आहे. राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांची प्रतिक्रिया लक्षवेधी ठरत आहे.गेल्या वर्षी राजकीय घडामोडी राज्यात घडल्या. कोणत्याही पक्षासंदर्भात घडामोडी घडल्यानंतर न्याय मागण्याची परंपरा आहे. त्याप्रकारे आम्ही निवडणूक आयोगाकडे गेलो होतो. त्यामध्ये आम्हीही आमचं म्हणणं मांडलं, इतरांनीही त्यांचं म्हणणं मांडलं. त्यावर अनेक तारखा पडल्या. सगळ्या वकिलांचं म्हणणं जाणून घेतल्यानंतर लोकशाहीत बहुमताला प्राधान्य दिलं जातं. आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह घड्याळ, झेंडा सगळ्या गोष्टी आम्हाला मिळाल्या. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, बाबा आत्रम, आदिती तटकरे यांच्याह ५० आमदारांनी घेतलेल्या निर्णयावर आज निवडणूक आयोगाने निकाल दिला आहे. हा निकाल मी विनम्रपणे स्वीकारतो.

### निर्णय आम्ही स्वीकारत आहोत

» ", असं अजित पवार म्हणाले.अदृश्य शक्तींनी मराठी माणसाचा पक्ष पळवला, असा आरोप सुप्रिया सुळेंनी केला. त्यावर अजित पवार म्हणाले, "आम्ही मराठीच आहोत. त्यामुळे पक्ष पळवण्याचा प्रश्न येतोच कुठे? आम्ही जास्त टीका टिप्पणी करत नाहीत. काम करणारी माणसं आहोत आम्ही. केंद्राच्या जास्तीत जास्त योजना महाराष्ट्रात आणणे. महाराष्ट्रात विकासाच्या करत प्रयत्नशील राहणे एवढं आमचं काम आहे.अधिकृत एक्स अकाऊंटवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, "आमच्या वकिलांनी मांडलेली बाजू ऐकून घेऊन निवडणूक आयोगाने दिलेला निर्णय आम्ही विनम्रपणे स्वीकारत आहोत!" निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर अजित पवार गटाच्या पक्ष कार्यालयाबाहेर कार्यकर्त्यांनी जल्लोष सुरू केला.

# प्रस्थापितांची जागा कोण घेणार?

## घराणे शाहीतून आलेले नवे नेते बदल घडवू शकत नाहीत

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राजकारणात एका रात्रीत कोणतीही गोष्ट घडू शकत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधी आणि काँग्रेसला राष्ट्रभर ओळख निर्माण करण्यासाठी जवळपास ३० वर्षांचा कालावधी लागला होता. जनसंघानंतर भाजपाला पहिला पंतप्रधान (अटलबिहारी वाजपेयी) होण्यासाठी अनेक दशकांची वाट पाहावी लागली. एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल, आपल्या देशाची लोकसंख्या १३० कोटी एवढी आहे. एखादा व्यक्ती आपल्या आयुष्यात बदल घडवू शकतो, असे १३० कोटी लोकांना समजायला निश्चितच वेळ जाईल, हे काम एका रात्रीत होणारे नाही. ज्या कुणाला हे काम करायचे असेल, त्यांना कमीतकमी १५ ते २० वर्षांचा वेळ द्यावा लागेल, अशी भूमिका निवडणूक रणनीतीकार आणि आता जनसुराज अभियानाच्या माध्यमातून नवा राजकीय विचार मांडणारे प्रशांत किशोर यांनी 'इंडियन एक्स्प्रेस अड्डा'मध्ये बोलताना मांडली.**



भारताच्या वर्तमान राजकारणात जर एखाद्या नेत्याचा उदय व्हायचा असेल तर त्याला दिवसाचे १२ तास काम करावे लागेल आणि त्याच्या हातात कमीतकमी १० वर्षांचा आराखडा असायला हवा, तरच तो पर्याय उभा करू शकतो, असेही प्रशांत किशोर म्हणाले. "मी काँग्रेसलाही हाच सल्ला दिला होता. तुमच्याकडे १०० हून अधिक वर्षांचा वारसा असेल, पण तुम्हाला पुन्हा नव्या अवतारात यावेच लागले. नव्या अवतारात आल्यानंतर कमीत कमी १० वर्षांचा काळ द्यावा लागेल, त्याशिवाय बदल घडवणे शक्य होणार नाही", असे मत प्रशांत किशोर यांनी व्यक्त केले. भारतातील विरोधक सध्या चुकीच्या वाटेवर असल्याचे सांगत त्यांनी एक मजेशीर उदाहरण दिले. ते म्हणाले, "भारतातील विरोधक आणि त्यांची धोरणे ही शेअर बाजारात 'डे ट्रेडिंग' करणाऱ्या गुंतवणूकदारासारखी आहेत. शेअर बाजारात रोजच्या रोज पैसे गुंतवून चांगले पैसे कमवू, असा या गुंतवणूकदारांचा हेतू असतो. पण इतिहास सांगतो की, डे ट्रेडिंगमध्ये कुणीही फारसे पैसे कमवत नाही. जे लोक समभाग विकत घेऊन १० किंवा २० वर्ष वाट पाहतात, तेच चांगले पैसे कमवतात. त्यामुळे राजकीय पक्षांनीही डे ट्रेडिंगच्या भानगडीत न पडता त्यांची विचारधारा आणि संघटनेवर अधिक लक्ष देऊन त्याची बांधणी करायला हवी. रोज नवी नवी धोरणे घेऊन यश मिळणार नाही." हा मुद्दा सांगताना प्रशांत किशोर पुढे म्हणाले, आज तुम्ही स्वबळावर लढत आहात, उद्या तुम्हाला इंडिया आघाडी बनवायची आहे. त्यानंतर तुम्ही राफेलचा मुद्दा घ्याल. तिसऱ्या दिवशी तुम्ही हिंदू व्हाल, अशी धरसोड वृत्ती तुम्हाला (विरोधकांना) यश देऊ शकणार नाही.प्रशांत किशोर यांनी शेअर बाजाराशी निगडित उदाहरण दिल्यानंतर 'इंडियन एक्स्प्रेस ग्रुप'चे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अनंत गोएंका यांनी रॅपिड फायर प्रश्नावलीमध्ये हाच धागा पकडून प्रश्न विचारला की, प्रशांत किशोर जर गुंतवणूकदार असतील तर विरोधकांमधील कोणत्या दहा समभागावर ते गुंतवणूक करतील. "अखिलेश यादव, आदित्य ठाकरे, चिराग पासवान, केटीआर, उदयनिधी स्टॅलिन, जगन मोहन रेड्डी, राघव चड्ढा, ओमर अब्दुल्ला आणि अभिषेक बॅनर्जी", अशी दहा नावे देऊन यापैकी कोणत्या पाच जणांची निवड कराल, असा प्रश्न गोएंका यांनी विचारला. प्रशांत किशोर यांनी या प्रश्नांवर त्यांच्या खास शैलीत उत्तर दिले. ते म्हणाले, ही सर्व नावे कुंडीत वाढलेली रोपं (पॉटेड प्लँट्स) आहेत. पुढे चालून हे समभाग मल्टीबॅगर होतील, असे सांगून तुम्ही मला १० वाईट समभाग निवडायला सांगत आहात. या दहा नावांपैकी कुणीही आश्वासक नसेल तर तुमच्या मनात असलेली नावे सांगा. यावर प्रशांत किशोर म्हणाले की, माझ्या नजरेसमोर सध्या एकही आश्वासक नाव दिसत नाही.यापुढे जाऊन प्रशांत किशोर यांनी त्यांचा मुद्दा आणखी विस्तृतपणे समजावून सांगितला. मी दक्षिण आफ्रिकेत काम करत असताना बिल गेट्स यांचे एक व्याख्यान ठेवण्यात आले होते. त्यात त्यांना विचारण्यात आले की, कोणता व्यक्ती तुमच्याहून अधिक श्रीमंत होऊ शकतो? यावर बिल गेट्स म्हणाले, कोण होईल हे मला माहीत नाही. पण, जो व्यक्ती माझी जागा घेईल तो नक्कीच माझ्या व्यवसायातील नसेल. कारण तो माझ्या व्यवसायातला असेल तर मी त्याला कसा पुढे जाऊ देईन? या उदाहरणावरून प्रशांत किशोर म्हणाले की, प्रस्थापित नेत्यांची जागा नक्कीच नवे आणि सध्याच्या राजकीय क्षितीजावर नसलेले लोकच घेतील. तुम्ही जुन्याच लोकांना पुन्हा पुन्हा लोकांच्या माथी मारू शकत नाहीत.

### विरोधक डे ट्रेडिंग करतायत

भारताच्या वर्तमान राजकारणात जर एखाद्या नेत्याचा उदय व्हायचा असेल तर त्याला दिवसाचे १२ तास काम करावे लागेल आणि त्याच्या हातात कमीतकमी १० वर्षांचा आराखडा असायला हवा, तरच तो पर्याय उभा करू शकतो, असेही प्रशांत किशोर म्हणाले. "मी काँग्रेसलाही हाच सल्ला दिला होता. तुमच्याकडे १०० हून अधिक वर्षांचा वारसा असेल, पण तुम्हाला पुन्हा नव्या अवतारात यावेच लागले. नव्या अवतारात आल्यानंतर कमीत कमी १० वर्षांचा काळ द्यावा लागेल, त्याशिवाय बदल घडवणे शक्य होणार नाही", असे मत प्रशांत किशोर यांनी व्यक्त केले. भारतातील विरोधक सध्या चुकीच्या वाटेवर असल्याचे सांगत त्यांनी एक मजेशीर उदाहरण दिले. ते म्हणाले, "भारतातील विरोधक आणि त्यांची धोरणे ही शेअर बाजारात 'डे ट्रेडिंग' करणाऱ्या गुंतवणूकदारासारखी आहेत. शेअर बाजारात रोजच्या रोज पैसे गुंतवून चांगले पैसे कमवू, असा या गुंतवणूकदारांचा हेतू असतो. पण इतिहास सांगतो की, डे ट्रेडिंगमध्ये कुणीही फारसे पैसे कमवत नाही. त्यामुळे राजकीय पक्षांनीही डे ट्रेडिंगच्या भानगडीत न पडता त्यांची विचारधारा आणि संघटनेवर अधिक लक्ष देऊन त्याची बांधणी करायला हवी. रोज नवी नवी धोरणे घेऊन यश मिळणार नाही." हा मुद्दा सांगताना प्रशांत किशोर पुढे म्हणाले.

---

# म्यानमारच्या सीमेवर बांधणार १६०० किमीचं कुंपण

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यासंदर्भातील माहिती दिली

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भारत-म्यानमान सीमेवर तब्बल १६४३ किमी लांबीचे कुंपण घालण्याचा मोठा निर्णय मोदी सरकारने घेतला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यासंदर्भातील माहिती दिली. देशाच्या सरक्षेच्या दृष्टीने हे मोठे पाऊल मानले जात आहे. म्यानमारमधून लोक अवैधरित्या प्रवेश करत होते. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, मोदी सरकार सुरक्षित सीमा निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहेत. या संदर्भात भारत-म्यानमारच्या १६४३ किमी लांबीच्या सीमेला कुंपण घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय गस्तीसाठी स्वतंत्र ट्रॅक तयार करण्यात येणार आहे. मणिपूरमधील मोरेहपासून १० किमी लांबीचे कुंपण पूर्ण झाले आहे. याशिवाय हायब्रीड सर्व्हिलन्स सिस्टिमद्वारे कुंपण घालण्याच्या इतर दोन पथदर्शी प्रकल्पांवर काम केले जात आहे. त्यांच्या बाजूने अरुणाचल प्रदेश आणि मणिपूरमध्येही दहा किलोमीटरचे कुंपण बांधले जाणार



आहे. याव्यतिरिक्त, मणिपूरमध्ये सुमारे २० किमीच्या कुंपणाच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली आहे आणि लवकरच काम सुरू होईल.हा निर्णय घेण्यामागे अनेक कारणे आहेत. मानवी तस्करी, अंमली पदार्थाचा व्यापार, बेकायदेशीर स्थलांतर या काही समस्या आहेत. ज्यांनी गेल्या काही वर्षांत भारत सरकारसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. त्यामुळे या सर्व बेकायदा कृत्यांना कुंपण घालण्याचा सरकारचा हेतू आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, मोदी सरकार सुरक्षित सीमा निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहेत. या संदर्भात भारत-म्यानमारच्या १६४३ किमी लांबीच्या सीमेला कुंपण घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय गस्तीसाठी स्वतंत्र ट्रॅक तयार करण्यात येणार आहे.

### 10 किमी लांबीचे कुंपण पूर्ण झाले

मणिपूरमधील मोरेहपासून १० किमी लांबीचे कुंपण पूर्ण झाले आहे. याशिवाय हायब्रीड सर्व्हिलन्स सिस्टिमद्वारे कुंपण घालण्याच्या इतर दोन पथदर्शी प्रकल्पांवर काम केले जात आहे. त्यांच्या बाजूने अरुणाचल प्रदेश आणि मणिपूरमध्येही दहा किलोमीटरचे कुंपण बांधले जाणार आहे. याव्यतिरिक्त, मणिपूरमध्ये सुमारे २० किमीच्या कुंपणाच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली आहे आणि लवकरच काम सुरू होईल.हा निर्णय घेण्यामागे अनेक कारणे आहेत. मानवी तस्करी, अंमली पदार्थाचा व्यापार, बेकायदेशीर स्थलांतर या काही समस्या आहेत. ज्यांनी गेल्या काही वर्षांत भारत सरकारसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. त्यामुळे या सर्व बेकायदा कृत्यांना कुंपण घालण्याचा सरकारचा हेतू आहे.

# संदीप रेड्डी मुलाला आवडला 'ॲनिमल'मधील 'हा' सीन



रणबीर कपूरची प्रमुख भूमिका असलेल्या 'ॲनिमल' चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चा सुरू आहे. 'ॲनिमल'चं दिग्दर्शन 'कबीर सिंग' फेम संदीप रेड्डी वांगाने केलं आहे. आतापर्यंत चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर रेकॉर्डब्रेक कामगिरी करत तब्बल ८०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. चित्रपटात रणबीरच्या बरोबरीनेचे बॉबी देओल, तृप्ती डीमरी यांच्या अभिनयाचंही प्रचंड कौतुक होताना दिसत आहे.याबरोबरच चित्रपटाचे दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा हेदेखील सध्या चांगलेच चर्चेत आहेत. चित्रपटावर टीका करणाऱ्या टीकाकारांना संदीप यांनी चोख उत्तर दिलं आहे. बऱ्याच मोठमोठ्या सेलिब्रिटीजनाही संदीप यांनी उत्तर दिलं आहे. सध्या संदीप त्यांच्या या वक्तव्यामुळे चर्चेत आहेत. नुकतंच त्यांनी त्यांच्या पत्नीची व ७ वर्षाच्या मुलाची या चित्रपटावर नेमकी काय प्रतिक्रिया होती ते स्पष्ट केलं आहे. संदीप यांच्या पत्नीला या चित्रपटात काहीच आक्षेपहार्य वाटलं नसल्याचं त्यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये स्पष्ट केलं आहे. शिवाय आपल्या मुलालादेखील चित्रपटातील कोणता प्रसंग अधिक आवडला याबद्दलही खुलासा केला आहे. संदीप यांनी आपल्या मुलाचं नाव अर्जुन रेड्डी ठेवलं आहे, २०१७ साली त्यांचा या नावाचा चित्रपत्र गाजला होता अन् त्यामुळेच त्यांनी आपल्या मुलाचे नाव त्या चित्रपटावर ठेवले. संदीप म्हणाले, "माझ्या पत्नीने पूर्ण चित्रपट पाहिला, तिला फक्त चित्रपटातील रक्तपात फारसा पसंत पडला नाही, पण इतर कोणत्याही गोष्टी तिला आक्षेपहार्य वाटल्या नाहीत, खासकरून ज्यावरून आत्ता गदारोळ सुरू आहे." पुढे आपल्या सात वर्षांच्या मुलाला चित्रपट दाखवण्याबद्दल संदीप म्हणाले.

# हेमा मालिनींच्या लेकीचा 11 वर्षांचा संसार मोडला

बॉलीवूडचे दिग्गज अभिनेते धर्मेंद्र व अभिनेत्री हेमा मालिनी यांची लेक ईशा देओलबद्दल महत्त्वाची बातमी समोर आली आहे. ईशा व तिचा पती व्यावसायिक भरत तख्तानी ११ वर्षांच्या संसारानंतर आता विभक्त झाले आहेत. ईशा आणि भरत यांच्या टीमकडून दिल्ली टाइम्सला निवेदन देण्यात आलं आहे. "आम्ही परस्पर संमतीने वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. आमच्या जीवनात होणारे बदल आणि आमच्या दोन मुलांच्या भवितव्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांच्या आनंदाचा व हिताचा आम्ही नेहमीच विचार करू. आमच्या प्रायव्हसीचा कृपया आदर करा." असं या निवेदनात नमूद करण्यात आलेलं आहे.ईशाने याबाबत सोशल मीडियावर अद्याप कोणतीही पोस्ट शेअर केलेली नाही. या जोडप्याला राध्या ( ६ ) आणि मिराया ( ४ ) अशा दोन मुली आहेत. दरम्यान, ईशा देओलने २९ जून २०१२ रोजी भरत तख्तानीशी अत्यंत साध्या पद्धतीने लग्न केलं होतं. दोघांचं लग्न इस्कॉन मंदिरात पार पडलं होतं. लग्नाच्या पाच वर्षानंतर या अभिनेत्रीने तिच्या पहिल्या अपत्याला म्हणजेच राध्याला जन्म दिला. त्यानंतर २०१९ मध्ये ईशाला दुसरी मुलगी झाली. अभिनेत्रीच्या वैयक्तिक आयुष्यात अडचणी निर्माण झाल्याच्या बातम्या याआधी अनेकदा आल्या होत्या. सोशल मीडियावर तिने पतीसह फोटो शेअर करणंही थांबवलं होतं. याशिवाय ईशाचा नवरा हेमा मालिनींच्या ७५ व्या वाढदिवसाला देखील हजर राहिला नव्हता. दोघेही सार्वजनिक कार्यक्रमात एकत्र दिसत नव्हते. त्यामुळे त्यांच्या घटस्फोटाच्या चर्चा अनेक दिवसांपासून रंगल्या होत्या.बॉलीवूडचे दिग्गज अभिनेते धर्मेंद्र व अभिनेत्री हेमा मालिनी यांची लेक ईशा देओलबद्दल महत्त्वाची बातमी समोर आली आहे. ईशा व तिचा पती व्यावसायिक भरत तख्तानी ११ वर्षांच्या संसारानंतर आता विभक्त झाले आहेत. आम्ही परस्पर संमतीने वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. आमच्या जीवनात होणारे बदल आणि आमच्या दोन मुलांच्या भवितव्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे.



# बॉबीच्या चाहत्यांसाठी खुशखबर

रणबीर कपूरची प्रमुख भूमिका असलेल्या 'ॲनिमल' चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चा सुरू आहे. 'ॲनिमल'चं दिग्दर्शन 'कबीर सिंग' फेम संदीप रेड्डी वांगाने केलं आहे. आतापर्यंत चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर रेकॉर्डब्रेक कामगिरी करत तब्बल ८०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. चित्रपटात रणबीरच्या बरोबरीनेचे बॉबी देओल, तृप्ती डीमरी यांच्या अभिनयाचंही प्रचंड कौतुक होताना दिसत आहे.रणबीरच्या बरोबरीनेच चित्रपटातील या सहकलाकारांची कामं लोकांना पसंत पडली आहेत. खासकरून या चित्रपटात केवळ १५ ते २० मिनीटांसाठी दिसणाऱ्या बॉबी देओलने बाजी मारली आहे. चित्रपटात बॉबीने अब्रार हक या खलनायकाची भूमिका निभावली आहे. अगदी काही मोजक्या सीन्समध्येच बॉबीने त्याच्या अभिनयातून सिद्ध केलं आहे की टु एक उत्कृष्ट नट आहे. 'ॲनिमल' पाहून झाल्यावर तर कित्येकांनी बॉबीला चित्रपटात आणखी वेळ द्यायला हवा होता अशी खंतही व्यक्त केली. आता मात्र बॉबीच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर येत आहे.'ॲनिमल'चे मार्केटिंग डायरेक्टर वरुण गुप्ता यांनी 'झुम'शी संवाद साधताना अब्रार हकच्या स्पिन ऑफ चित्रपटाबद्दल भाष्य केलं आहे.

# रितेश देशमुखने मारल्या शिट्ट्या!

महाराष्ट्राचा फेवरेट कोण' हा मराठी कलाविश्वात मानात समजला जाणारा पुरस्कार आहे. दरवर्षी या पुरस्कार सोहळ्यात मराठी मनोरंजनसृष्टीत उत्तम कामगिरी केलेल्या कलाकारांचा व चित्रपटांचा सन्मान केला जातो. यंदा हा सोहळा १८ फेब्रुवारीला पार पडणार आहे. या सोहळ्याला मृणाल ठाकूर, रितेश-जिनिलीया, महेश मांजरेकर, पूजा सावंत, सुचित्रा बांदेकर, निर्मिती सावंत यांसारखे अनेक दिग्गज कलाकार हजेरी लावणार आहे. नुकताच या सोहळ्याचा प्रोमो 'झी टॉकीज' वाहिनीकडून आहे.' कलाविश्वात नेहमीच चर्चा असते. चित्रपटांमध्ये पुरस्कारासाठी चांगलीच चुरस रंगल्याचं पाहायला मिळालं.



# कंगनाने संदीप वांगासह काम करण्यास दिला नकार

बॉलीवूडची क्वीन कंगना रणौत अभिनयासह तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. ती अनेक विषयांवर तिची मतं मांडत असते. 'ॲनिमल' प्रदर्शित झाल्यानंतर कंगनाने या चित्रपटाबद्दल प्रतिक्रिया दिली होती. कंगनाला हा चित्रपट आवडला नव्हता; तर दुसरीकडे 'ॲनिमल'चे दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांनी कंगनाचं कौतुक केलं आणि तिच्याबरोबर काम करायची इच्छा व्यक्त केली. परंतु, त्यालाही कंगनाने नकार दिला.अलीकडेच कंगनाने याबद्दलचा एक व्हिडीओ एक्सवर शेअर केला आहे. यात संदीप रेड्डी वांगा म्हणाले होते, "जर मला कंगनासह काम करायची संधी मिळाली आणि जर एखाद्या पात्रासाठी कंगना मला योग्य वाटली तर नक्कीच मी तिला भेटून कथानक सांगेन. तिचा 'क्वीन' आणि इतर चित्रपटांमधील अभिनय मला खूप आवडला होता. तिला 'ॲनिमल' चित्रपट आवडला नसेल तरीही मला त्याचा राग आलेला नाही. कारण मी तिचं काम पाहिल आहे आणि मला तिच्या या वक्तव्याबाबत वाईट नाही वाटलं. मी उपरोधिकपणे हे बोलत नसून मला खरंच तिचा अभिनय आवडतो."दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांचा हा व्हिडीओ शेअर करत कंगनाने उत्तर दिलं. "समीक्षा आणि टीका सारख्या नसतात, प्रत्येक कलाकृतीची समीक्षा आणि चर्चा व्हायला हवी ही एक सामान्य गोष्ट आहे. माझ्या समीक्षेवर हसत हसत संदीपजींनी ज्या प्रकारे माझ्याबद्दल आदर दाखवला, त्यावरून असं म्हणता येईल की ते केवळ 'मर्दानी' चित्रपटच बनवत भूमिका देऊ नका नाहीतर तुमचे अल्फा मेल हिरो फेमिनिस्ट होतील आणि मग तुमचेही चित्रपट फ्लॉप होतील,.

# तिसऱ्या कसोटीत बुमराहला आराम?

## दुसऱ्या कसोटी सामन्यात इंग्लंडचा 106 धावांनी धुव्वा उडवला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**रोहित शर्माच्या भारतीय संघानं विशाखापट्टणमच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात इंग्लंडचा 106 धावांनी धुव्वा उडवला. त्याआधी पहिल्या कसोटी सामन्यात इंग्लंडने भारताचा 28 धावांनी पराभव केला होता. पाच सामन्याच्या कसोटी मालिका 1-1 बरोबरीत आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसरा कसोटी सामना 15 फेब्रुवारी रोजी होणार आहे. राजकोटमध्ये दोन्ही संघ आमनेसामने असतील. अखेरच्या तीन कसोटी सामन्यासाठी आज टीम इंडियाची निवड होण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तिसऱ्या कसोटी सामन्यात वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला आराम देण्यात येणार आहे.**

मीडिया रिपोर्ट्सनुसार, तिसऱ्या कसोटी सामन्यासाठी जसप्रीत बुमराहला आराम दिला जाऊ शकतो. याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पण बुमराहाला तिसऱ्या कसोटीतून आराम दिला जाण्याची शक्यता वर्तवण्यात येतेय.भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेत सर्वाधिक विकेट घेणाऱ्या गोलंदाजात जसप्रीत बुमराह पहिल्या स्थानावर आहे. बुमराहने दोन कसोटी सामन्यात 15 विकेट घेतल्या आहेत. हैदराबाद कसोटीत बुमराहने 6 विकेट घेतल्या होत्या. विशाखापट्टणमच्या दुसऱ्या कसोटीत बुमराहने 9 फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला होता. पहिल्या डावात सहा तर दुसऱ्या डावात तीन विकेट घेतल्या. विशाखापट्टणमच्या दुसऱ्या कसोटीत शानदार गोलंदाजी करणाऱ्या बुमराहला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. रोहित शर्माच्या भारतीय संघानं विशाखापट्टणमच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात इंग्लंडचा 106 धावांनी धुव्वा उडवला. भारतीय संघानं या विजयासह पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत 1-1 अशी बरोबरी साधली. या कसोटीत भारतानं इंग्लंडला विजयासाठी 399 धावांचं आव्हान दिलं होतं. पण आदल्या दिवशीच्या एक




बाद ६७ धावांवरून इंग्लंडचा दुसरा डाव 292 धावांत आटोपला. भारताकडून जसप्रीत बुमरानं 46 धावांत तीन आणि रवींद्रन अश्विननं 72 धावांत तीन फलंदाजांना माघारी धाडलं. मुकेशकुमार, अक्षर पटेल आणि कुलदीप यादवनं प्रत्येकी एक विकेट काढली. जसप्रीत बुमराला या कसोटीतल्या सर्वोत्तम खेळाडूचा मान देण्यात आला. त्यानं पहिल्या डावात सहा आणि दुसऱ्या डावात तीन फलंदाजांना माघारी धाडलं.पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारताने इंग्लंडचा १०६ धावांनी पराभव केला. विशाखापट्टणम येथे झालेल्या या सामन्यात इंग्लंडचा संघ ३९९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना २९२ धावांवर गारद झाला. या विजयासह भारताने कसोटी मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. या सामन्यातील पराभवावर प्रतिक्रिया देताना बेन स्टोक्सने तंत्रज्ञानावर प्रश्न उपस्थित केले.दुसऱ्या कसोटीतील पराभवानंतर इंग्लिश कर्णधार बेन स्टोक्सच्या वेदना व्यक्त झाल्या. पराभवानंतर स्टोक्सने तंत्रावरही प्रश्न उपस्थित केले. डीआरएस तंत्रातील चुकीमुळे झॅक क्रॉऊलीला एलबीडब्ल्यू आऊट व्हावे लागल्याचे स्टोक्सने सांगितले. दुसऱ्या डावात ७३ धावा केल्यानंतर कुलदीप यादवच्या चेंडूवर क्रॉऊलीला एलबीडब्ल्यू घोषित करण्यात आले.क्रॉऊलीला मैदानावरील

### स्टोक्सने उपस्थित केले प्रश्न

आमच्या खेळाडूंना कदाचित व्हायरसची लागण झाली आहे. मात्र, हे पराभवाचे किंवा कशाचेही निमित्त नाही.पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारताने इंग्लंडचा १०६ धावांनी पराभव केला. विशाखापट्टणम येथे झालेल्या या सामन्यात इंग्लंडचा संघ ३९९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना २९२ धावांवर गारद झाला. या विजयासह भारताने कसोटी मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. या सामन्यातील पराभवावर प्रतिक्रिया देताना बेन स्टोक्सने तंत्रज्ञानावर प्रश्न उपस्थित केले.दुसऱ्या कसोटीतील पराभवानंतर इंग्लिश कर्णधार बेन स्टोक्सच्या वेदना व्यक्त झाल्या.

पंचांनी आऊट दिले नाही, पण भारतीय कर्णधार रोहित शर्माने डीआरएस घेतल्यानंतर त्याला आऊट घोषित करण्यात आले. कुलदीपचा चेंडू मधल्या स्टंपलासमोर आदळल्यानंतर लेग स्टंपकडे वळत होता. डीआरएसमध्ये चेंडू लेगस्टंपला स्पर्श करताना दिसला, पण स्टोक्स याच्याशी सहमत नव्हता. सामन्यानंतर स्टोक्स म्हणाला, 'खेळात तंत्रज्ञानाचा वापर स्पष्टपणे दिसून येतो. तो कधीच १०० टक्के बरोबर असू शकत नाही. याची कारणे प्रत्येकाला समजतात. त्यामुळे आपल्याकडे अंपायर्स कॉल्स आहे. मला वाटते या प्रसंगी तंत्रज्ञानाने चुकीचा निकाल दिला. हे माझे वैयक्तिक मत आहे. मी असे म्हणणार नाही की ते आमच्या पराभवाचे कारण होते. या निमित्ताने तंत्रज्ञान चुकीचे ठरले, असे माझे वैयक्तिक मत आहे एवढेच मी सांगत आहे. इंग्लंडचा कर्णधार म्हणाला, 'तुम्ही भूतकाळातील गोष्टींसह फार काही करू शकत नाही. एक निर्णय घेतला गेला आहे, आणि घेतलेला निर्णय तुम्ही मागे घेऊ शकत नाही.' स्टोक्स पुढे म्हणाला, 'आज सकाळी उठल्यानंतर काही खेळाडूंना बरे वाटत नव्हते. जेव्हा प्रत्येकामध्ये समान लक्षणे दिसतात, तेव्हा तुम्हाला कळते की काहीतरी घडत आहे.

# ऑस्ट्रेलियाने २५९ चेंडू शिल्लक असताना विजय!

## अवघ्या 41 चेंडूत मॅच खिशात, तिसऱ्या वनडेसह ऑस्ट्रेलियाचं निर्भेळ यश

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कॅनबेरा येथे खेळल्या गेलेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात, ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजचा आठ गडी राखून पराभव केला. त्याचबरोबर तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका ३-० ने जिंकली. तिसऱ्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजचा संघ २४.१ षटकांत ८६ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियन संघाने ६.५ षटकांत ८७/२ धावा केल्या आणि सामना जिंकला.**




ऑस्ट्रेलियाच्या एकदिवसीय संघात पदार्पण करणाऱ्या झेवियर बार्टलेटसाठी ही मालिका खास ठरली. त्याने दोन सामन्यांमध्ये ८ विकेट्स घेतल्याबद्दल सामनावीर आणि मालिकेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून त्याची निवड करण्यात आली. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि सुरुवातीपासूनच वेस्ट इंडिजला धक्के देण्यास सुरुवात केली. डावाच्या तिसऱ्या षटकात सलामीवीर केजॉर्न ओटली ८ धावा काढून झेवियर बार्टलेटचा बळी ठरला. यानंतर कार्टीने १० धावा आणि कर्णधार शाई होपनेही ४ धावा केल्या. १३व्या षटकात कॅरेबियन संघाला चौथा धक्का बसला आणि टेडी बिशप खाते न उघडता ४४ धावांवर बाद झाला. ॲलेक अथानाझेने काही काळ टिकण्याचा प्रयत्न केला पण मोठी खेळी खेळू शकला नाही. तो ६० चेंडूत ३२ धावा केल्यानंतर २० व्या षटकात ७१ धावांवर बाद झाला. विकेट्सची पडझड सुरूच राहिली आणि उर्वरित फलंदाजांमध्ये फक्त रोस्टन चेस (१२) दुहेरी आकडी धावसंख्या गाठू शकला. अशाप्रकारे वेस्ट इंडिजने ऑस्ट्रेलियाविरुद्ध वनडेतील आपली दुसरी सर्वात कमी निच्चांकी धावसंख्या नोंदवली. ऑस्ट्रेलियाकडून झेवियर बार्टलेटने चार, लान्स मॉरिस आणि ॲडम झाम्पाने प्रत्येकी दोन गडी बाद केले.

### सर्वात मोठा विजय

मॅकगर्कने अधिक आक्रमक वृत्ती दाखवत झटपट धावा काढण्याच्या प्रयत्नात १८ चेंडूत ४१ धावा केल्या आणि पाचव्या षटकात तो अल्झारी जोसेफचा बळी ठरला. यानंतर फलंदाजीला आलेला ॲरॉन हार्डी काही विशेष करू शकला नाही आणि २ धावा केल्यानंतर तो ८० धावांवर ओशान थॉमसच्या चेंडूवर बाद झाला. कर्णधार स्टीव्ह स्मिथने ३ चेंडूत नाबाद ६ धावा करत सामना संपवला. इंग्लिश १६ चेंडूत ३५ धावांवर नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाने २५९ चेंडू शिल्लक असताना विजय मिळवला, जो चेंडूंच्या बाबतीतही त्यांचा सर्वात मोठा विजय आहे. यापूर्वी त्यांनी २००४ मध्ये अमेरिकेविरुद्धचा सामना २५३ चेंडू शिल्लक असताना जिंकला होता.